FORM-1A 0058156

N.C.R.B.

I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District बृहन्मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. ०६, वर्ष Year २०२४, दिनांक Date २३/०३/२०२४

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. १९८८, कलमे Sections ७

   (ii) अधिनियम Act —, कलमे Sections —

   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections —

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरुवार, तारीख पासून Date from २१/१२/२०२३ वेळ Time १९.०० वा, तारीख पर्यंत Date to २१/१२/२०२३ Time २१.२० वा

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २१/१२/२०२३ वेळ Time १९.०० वा

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. १८/२०२४ तारीख Date २३/०३/२०२४ वेळ Time १२.०५ वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लाचेची मागणी संदर्भात, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा अंदाजे २० कि., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र.

   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name तुंबा रेस्टॉरंट हॉटेल, ठिकाणाचे नंबर No. if any पठाणवाडी, गल्ली Ward मालाड ईस्ट मुंबई, रस्त्याचे नाव Name of road

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station, तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name जाहिद हुसेन अनवर जमादार (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name अनवर कासीम जमादार

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age २६/०८/१९९१ (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8169624142

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue —, दिल्याचे ठिकाण Place of Issue —, (f) व्यवसाय Occupation पानसुपारी विक्रेता

   (g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste, जनजात Sub-Caste

   (h) पत्ता Address : एम जी मुल्ला चाळ, गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No. २, फोन / मो. नं. Phone/M. No., पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No.

   रस्त्याचे नाव Road पठाणवाडी, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place नुरानी मस्जिद, गाव Village मालाड, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn. कुरार पो.ठाणे

   तालुका Taluka, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   आरोपी लोकसेवक - श्री काझी, कुरार पोलीस ठाणे मुंबई (पूर्ण नाव माहित नाही)

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

Scanned with OKEN Scanner

फिर्याद            दि. 13/03/2024

श्री. जाहीद हुसेन अनवर जमादार
वय - 31 वर्षे : धंदा - पानसुपारी विक्रेता
य. हि. कलम. नं. 06 प्रमाणे यांच्या
स्वतंत्र पानावरती मराठीत संगणीकृत
केलेला जबाब हाच नमुद गुन्ह्याची
फिर्याद संबोधण्यात येत आहे.

समक्ष
A.S. Chaudhari
(अतुल चौधरी)
पोलीस निरीक्षक
लोमार्ग मुंबई.

Jamadar
13/03/2024

फिर्याद दिनांक – १३/०३/२०२४

श्री. जाहिद हुसेन अन्वर जमादार वय ३१ वर्षे, धंदा– पाण सूपारी विक्रेता रा.ठि. पठाणवाडी, मालाड पुर्व, मुंबई मो.न. ८१६९६२४१४२ / ७०२१७५७९६७

---

मी वर नमुदप्रमाणे असुन वरील नमुद पत्यावर मी माझे जन्मापासुन माझे संपुर्ण कुटूंबासह रहात आहे. मी रहात असलेल्या मालाड पठाणवाडी येथे पान, सुपारी, तंबाखु, सिगारेट विक्रीचा व्यवसाय करीत आहे. मी दि.११/१२/२०२३ रोजी माझेकडील पान, सुगंधी सुपारी, तंबाखु, सिगारेट माल भाडयाची रिक्षा करुन मालाड परिसरात विक्रीकरीता नेत असताना साध्या कपडयातील दोन इसमानी माझी रिक्षा थांबवली. त्यांनी त्यांची ओळख कुरार पोलीस ठाणेतील मिल स्पेशल असल्याचे सांगुन त्यांनी त्यांचे नाव श्री काझी व श्री गोमासे असे सांगितले. त्यानंतर त्यांनी माझे रिक्षातील मालाची तपासणी करुन रिक्षामध्ये गुटखा असल्याचे सांगुन माझी रिक्षा व विक्रीचा माल कुरार पोलीस चौकीस नेली. श्री काझी व श्री गोमासे यांनी माझेकडील सुगंधी सुपारी, तंबाखु, सिगारेटचा माल व रिक्षा सोडविण्याकरीता दिड लाख रक्कमेची मागणी केली. भाडयाची रिक्षा असल्याने मी त्यावेळी त्यांना रिक्षा व विक्रीकरीता नेत असलेला माल सोडविण्यासाठी एक लाख रुपये दिले. त्यानंतर लोकसेवक श्री काझी व श्री गोमासे यांनी मला दि.१३/१२/२०२३ रोजी भेटावयास बोलविले होते. दि.१३/१२/२०२३ रोजी दुपारी मी लोकसेवक श्री काझी व श्री गोमासे यांस भेटलो असता, त्यांनी सुगंधी सुपारी व गुटखा विक्रीचा धंदा चालु ठेवायचा असल्यास मंथली रु.४०,०००/– रक्कम दयावे लागतील. जर रक्कम दिली नाही तर तुला सुपारी, तंबाखूचा धंदा करू देणार नाही असे सांगितले. सदरची रक्कम दुसऱ्या दिवशी म्हणजे दि.१४/१२/२०२३ रोजी आणुन देण्यास सांगितले.

मला श्री काझी व श्री गोमोसे यांना रु.४०,०००/– लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १३/१२/२०२३ रोजी सांयकाळी १९.०० वा. दरम्यान अॅन्टी करप्शन कार्यालयात प्रत्यक्ष तक्रार देण्यास आलो. मी अॅन्टी करप्शन कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटलो व वरिष्ठांनी माझी तक्रार ऐकूण घेवून माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक अतुल चौधरी यांची नेमणुक केली व सदर कारवाई दरम्यान योग्य ते मार्गदर्शन व लक्ष देण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री पिंगुवाले यांची नेमणुक केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक अतुल चौधरी यांना मी स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली. त्यावेळी पोलीस निरीक्षक अतुल चौधरी यांनी मी केलेल्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी केली जाणार असल्याचे सांगुन लोकसेवक सांयकाळी भेटतील का? याबाबत विचारणा केली असता लोकसेवक श्री काझी व श्री गोमासे यांनी सकाळी भेटावयास बोलविले असुन त्यावेळी त्यांची भेट होईल असे मी पो.नि. चौधरी यांना सांगितले. त्यावरुन मला दुसऱ्या दिवशी दि.१४/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. कार्यालयात बोलविले.

मी, दि.१४/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. अॅन्टीकरप्शन कार्यालयात पो.नि. अतुल चौधरी यांच्या समक्ष हजर झालो. त्यावेळी पो.नि. अतुल चौधरी यांनी दोन पंचाना पाचारण केले. काही वेळात पोलीस निरीक्षक अतुल चौधरी यांच्या कक्षामध्ये पंच हजर झाले. पो.नि. अतुल चौधरी यांनी पंच १) श्री गौतम सुभाष कांबळे व २) अजिक्य सुरेश डुबल – सहायक मोटर वाहन

Jamadar, 1

Scanned with OKEN Scanner

निरीक्षक, प्रादेशीक परिवहन विभाग, बोरीवली, कांदळपाडा, दहिसर वेस्ट, मुंबई यांच्या सोबत माझी ओळख करून दिली. त्यानंतर मी दि.१३/१२/२०२३ रोजी दिलेली माझी लेखी तक्रार पंचाना वाचावयास दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक अतुल चौधरी यांनी मला सांगितले की, मी दिलेल्या तक्रारीची पंच श्री. कांबळे यांचेसोबत लोकसेवक यांनी भेटावयास बोलविलेल्या ठिकाणी जावुन पडताळणी करण्यात येणार आहे.

मी दिलेल्या लेखी तक्रारीवरून दि.१४/१२/२०२३ रोजी पडताळणी दरम्यान मला घ्यावयाच्या योग्य त्या सुचना देण्यात आल्या. लोकसेवक श्री काझी व श्री गोमासे यांना भेटावयास जाण्याअगोदर त्यांचा ठावठिकाण्याबाबत पर्यवेक्षक अधिकारी पो.नि. पिंगुवाले यांनी मला लोकसेवक यांना फोन कॉल करण्यास सांगितले. त्यावर पो.नि. चौधरी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु केला. मी प्रथम श्री काझी यांच्या मोबाईल क्र. ८८५५८५०६०२ वर मोबाईल स्पिकर ऑन करुन कॉल केला परंतु त्यांनी उचलला नाही. म्हणुन नंतर मी पुन्हा श्री काझी यांच्या मो.न. ८८५५८५०६०२ वर व्हॉटसअप कॉल केला तेव्हा त्यांनी उचलला, तेव्हा त्यांनी मला सांगितले की, ते बाहेर असुन श्री गोमोसे यांच्याशी भेटुन बोलण्याबाबत सांगितले. म्हणुन मी नंतर श्री गोमोस यांचा मो.न. ९१३७४३९८६६ वर मोबाईल स्पिकर ऑन करुन कॉल केला असता प्रथम उचलला नाही त्यानंतर पुन्हा कॉल केला असता त्यांनी कॉल उचलला तेव्हा श्री गोमासे यांनी सांगितले की, "थोडी देर मे काझी साहब और मै साथ मे आ जाता हु.". असे सांगितले. त्यानंतर एका तासानंतर पुन्हा लोकसेवक श्री काझी यांचा मो.न. ८८५५८५०६०२ वर व्हॉटसअप कॉल केला असता त्यांनी तुंबा हॉटेल येथे भेटण्यास बोलविले. सदर मोबाईल व्हॉटसअपवर झालेले संभाषण पो.नि. चौधरी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले आहे.

त्यानंतर पो.नि. चौधरी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टाच्या आतील बनियानला लावण्यात आला. त्यानंतर मी व पंच श्री कांबळे ऑटो रिक्षाने तुंबा रेस्टारंट हॉटेल, पठाणवाडी, मालाड, ईस्ट, मुंबई या ठिकाणी पहिल्या माळयावर जावुन बसलो. काही वेळात श्री काझी हे एकटेच तुबा रेस्टारंट हॉटेल च्या पहिल्या माळयावर आले. श्री काझी हे माझेशी बोलत असताना माझे सोबत असलेले पंच श्री कांबळे यांच्याबाबत त्यांनी विचारणा केली. तेव्हा मी त्यांचे नाव सलीमभाई असे सांगितले. त्यानंतर मी माझे कामाबाबत चर्चा करीत असताना म्हणालो की, **मेरा तो बात हो गया तुम लोग चालीस बोले थे ना.** तेव्हा श्री काझी **"हा"** म्हणाले त्यांवर मी म्हणालो की, अगर तुम अॅग्री करते हो तो... तेव्हा श्री काझी म्हणाले की, '**तुम जैसा बोले वैसा... बोलो ना... हा.** " असे माझे व श्री काझी मध्ये संभाषण चालु असतेवळी मी म्हणालो चालीस का बोले... तुम्हारा तीस मे... तेव्हा श्री काझी म्हणाले " **ठिक है... ठिक है... मै बताता हु पहिले सिस्टम तो करो....** त्यावर मी त्यांना सायंकाळी तीस घेवुन देतो असे सांगितले, त्यावर श्री काझी **"हा"** म्हणाले. त्यानंतर मी व पंच श्री कांबळे परत शासकिय वाहनाजवळ येवुन पो.नि. अतुल चौधरी यांना भेटलो. पो.नि. चौधरी यांनी माझे शर्टाच्या आतील बनियानला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला व स्वत:जवळ ठेवला. पो.नि. चौधरी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता सदर संभाषणामध्ये श्री काझी यांनी माझेकडे रु.३०,०००/- रक्कमेची मागणी करुन



Scanned with OKEN Scanner

स्विकारण्याचे मान्य केले आहे. तेंव्हा खात्री झाली की, श्री काझी हे स्वतःसाठीच रु.३०,०००/– रक्कमेची माझेकडे लाचेची मागणी करीत आहेत.

त्यानंतर त्यांच दिवशी दि.१४/१२/२०२३ सांयकाळी लोकसेवक श्री काझी यांना भेटण्यास जाण्याअगोदर पो.नि. अतुल चौधरी व पो.नि. पिंगुवाले यांनी सापळापुर्व /सापळा कारवाईचे आयोजन केले. तेव्हा मी माझे बचतीमधील रु.३०,०००/– रक्कमेच्या रु ५००/– दराच्या ६० भारतीय चलनातील नोटा पो.नि. चौधरी यांचेकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्यास दिल्या. पो.नि. चौधरी यांनी पथकातील वाहन चालक श्री भोसले यांना बोलावुन पंचासमक्ष नोटांना अँथ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावुन सदर नोटाना अँथ्रोसिन पावडर लावण्यास सांगितली. त्यावरुन श्री भोसले यांनी लाच रक्कमेस अँन्थ्रोसिन पावडर लावुन सदरची लाच रक्कम मी परिधान केलेल्या पॅन्टच्या पुढील उजव्या खिश्यात श्री भोसले यांनी ठेवल्या. तेव्हा पो.नि. पिंगुवाले यांनी मला सांगितले की, लोकसेवक श्री काझी यांनी तुबा रेस्टारंट येथे लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डोक्यावरुन डावा हात सतत फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याबाबत इशारा करतील. त्यांनतर मी माझे मो.न.७०२१७५७९६७ वरुन लोकसेवक श्री काझी यांचा मो.न.८८५५८५०६०२ वर व्हॉटसअॅप कॉल करुन भेटीबाबत विचारणा केली असता त्यांनी १५ ते २० मिनीटामध्ये तुबा रेस्टारंट हॉटेल येथे भेटण्यास बोलविले. सदर बाबतचे संभाषण पो.नि. चौधरी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले आहे. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांचे सुचनेवरुन पो.नि. पिंगुवाले स्वतः व सापळा पथकातील अंमलदार हे तुंबा रेस्टारट रवाना झाले. त्यानंतर पो.नि. चौधरी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टाच्या आतील बनियानला लावला त्यानंतर मी, पंच श्री कांबळे असे ऑटो रिक्षाने तुंबा हॉटेल येथे गेलो. आमचे मागोमाग उर्वरीत सापळा पथकातील अधिकारी व अमंलदार आले. तुबा रेस्टारंट हॉटेलमध्ये श्री काझी हे बराच वेळ झाला परंतु ते आले नाहीत. म्हणुन मी पुन्हा श्री काझी यांना त्यांचे मोबाईलवर कॉल करण्याचा प्रयत्न केला परंतु श्री काझी यांनी कॉल उचलला नाही. म्हणुन सदर वेळी श्री काझी यांची भेट झाली नाही. त्यानंतर पो.नि. चौधरी यांनी माझे शर्टाच्या आतील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन बंद केला. लोकसेवक श्री काझी हे मला कॉल करतील तेव्हा आपण त्यांची भेट घेवु असे मी पो.नि. पिंगुवाले यांना सांगितले, परंतु त्यानंतर श्री काझी यांनी मला कॉल केला नाही.

त्यानंतर दि.१८/१२/२०२३ रोजी मी मालाड परिसरात माझा माल पोहचविण्याकरीता जात असताना श्री काझी मला वाटेत भेटले. तेव्हा त्यांनी मला दोन तीन दिवसामध्ये फोन कॉल करुन सांगतो त्यावेळी सदरची रक्कम घेवुन ये असे मला श्री काझी यांनी सांगितले. याबाबतची माहिती मी दि.१९/१२/२०२३ अँन्टीकरप्शनचे अधिकारी पो.नि. चौधरी यांना सांगितले.

त्यानंतर मी दिनांक २२/१२/२०२३ रोजी अँन्टी करप्शन ऑफिस येथे पो.नि. चौधरी यांचे समक्ष हजर झालो. पो.नि. चौधरी यांनी मला लोकसेवक श्री काझी यांचेकडे जावुन पुन्हा सापळा कारवाई करण्याबाबत अवगत केले असता, मी सांगितले की, श्री काझी यांचा मला फोन आला नाही कदाचीत त्यांना माझेबाबत संशय आला असुन ते मला आता यापुढे भेटणार नाहीत. त्यामुळे सापळा कारवाई करणे शक्य होणार नसल्याचे मी पो.नि. चौधरी यांना सांगितले.

**श्री. जाहिद हुसेन अन्वर जमादार यांची दि.१३/०३/२०२४ रोजीची फिर्यादी पुढे चालु......**

त्यानंतर पो.नि. अतुल चौधरी यांनी मला लोकसेवक श्री काझी यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याकरीता वारंवार ला.प्र.वि. वरळी, मुंबई कार्यालयात हजर रहाण्याकरीता कळविले होते. परंतु माझे कुंटूबातील आजारपणामुळे ला.प्र.वि. वरळी, मुंबई कार्यालयात हजर राहु शकलो नाही. आज रोजी मी ला.प्र.वि. वरळी, मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहुन लोकसेवक श्री काझी यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्याकरीता समक्ष हजर आहे.

लोकसेवक श्री काझी (पुर्ण नाव माहित नाही) यांच्याशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देवाण—घेवाणीचे व्यवहार नाहीत.

तरी दिनांक १४/१२/२०२३ रोजी श्री काझी (पुर्ण नाव माहित नाही) कुरार पोलीस ठाणे, मुंबई यांनी त्यांचे लोकसेवक या पदाचा गैरवापर करून स्वत:च्या गैरफायदयाकरीता माझा पान सुपारी, तंबाखु, सिगारेट विक्रीचा व्यवसाय चालु ठेवण्याकरीता सरकारी पंचासमक्ष माझेकडे रु.३०,०००/— लाचेची मागणी करुन ती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला म्हणुन लोकसेवक श्री काझी (पुर्ण नाव माहित नाही) कुरार पोलीस ठाणे, मुंबई यांच्याविरुध्द् माझी कायदेशीर तक्रार आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मी वाचुन पाहिला असता तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष
A.S.Chaudhari
(अतुल चौधरी) 13/03
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Jamadar
13/03/2024

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तक्रारदार वैयक्तिक अडचणीमुळे आज रोजी उपस्थित झाल्याने

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमुद ता. व वे. व ठि. आरोपी लोकसेवक श्री. काळे, कुरार पोलीस ठाणे मुंबई (पूर्ण नाव माहीत नाही) यानी त्यांचे लोकसेवक पदाचा गैरवापर करुन यातील फिर्यादी शाहीद हुसेन अनवर जमादार यांचेकडून गैरफायदा मिळविण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांच्या पान, सुपारी विक्रीचा व्यवसाय चालू देण्यासाठी नमुद आरोपी लोकसेवक श्री काळे यांनी फिर्यादी यांचेकडे रु 30,000/- (तीस हजार) पंचासमक्ष लाचेची मागणी केली व ती स्वीकारण्याचा प्रयत्न केला. अशी फिर्याद फिर्यादी यांनी लोकसेवक श्री काळे, कुरार पो. ठाणे मुंबई (पूर्ण नाव माहीत नाही) यांचे विरुद्ध दिल्याने भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक, अतुल चौधरी, ला.प्र.वि., मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] 13/03/2024

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature] A.S. Chaudhari 13/03

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name अतुल चौधरी

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner